
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र • शुक्रवार दि.६ डिसेंबर २०२४ • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष २ रे • अंक-१०१ • पाने ४ • किंमत ४ रुपये

## देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदी विराजमान !

**मुंबई (वृत्तसंस्था)**–विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर १३ दिवसांनी आज महाराष्ट्राला नवे सरकार मिळाले. भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आयोजित एका शानदार समारंभात महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून पद व गोपनीयतेची शपथ घेतली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली. फडणवीस आता महाराष्ट्राचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झालेत.देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. शपथ घेण्यापूर्वी त्यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव घेतले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शहा यांचे आभारही मानले.एकनाथ शिंदे यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. ते सहाव्यांदा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झालेत.या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व देशभरातील गणमान्य व्यक्ती उपस्थित होते.



## संपादकीय



# ‘वारसा’ जपण्याचा ध्यास

वारसा... एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे सुपूर्द केला जाणारा खजिना. मग तो ज्ञानाचा असो, अनुभवाचा, कलेचा किंवा परंपरेचा. हा वारसाच माणसाचं आयुष्य समृद्ध आणि सुसंस्कृत बनवतो. कोल्हापूरसारख्या ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी तर कला, क्रीडा, परंपरा, इतिहास या साऱ्याचा वारसा अनेकविध रूपांमध्ये दिसतो. एकीकडे आसमंतात पन्हाळगड-विशाळगडसारखे शौर्यगाथांचे खंबीर साक्षीदार, तर दुसरीकडे मातीतल्या कुस्तीसारख्या खेळाची रग अंगात भिनलेली... या अशा मातीत छत्रपती शिवरायांसारख्या द्रष्ट्या सेनानीने रुजवलेली ‘शिवकालीन युद्धकला’ फुलली नसती तरच नवल!बलाढ्य आणि शस्त्रसज्ज मुघल सेनेशी मोजके मावळे आणि तुटपुंजी शस्त्रं घेऊन लढताना शिवरायांनी गनिमी काव्याचा अफलातून वापर केला. यासाठी शिवरायांनी जी शस्त्रविद्या विकसित केली, तीच शिवकालीन युद्धकला. पुढे इंग्रज राजवटीत युद्धासाठी तिचा वापर थांबला, तरी कला म्हणून ती जिवंत राहिली; किंबहुना कित्येक वस्तादांनी आपलं आयुष्य खर्ची घालून ती जिवंत ठेवली. आज मात्र या समृद्ध वारशाला काहीशी उतरती कळा लागली असून शासकीय आणि एकूणच अनास्थेमुळे इतका अमूल्य ठेवा उपेक्षित आणि दुर्लक्षित राहिला आहे...

हे सगळं एका तरुण सर्जनशील कलावंताच्या नजरेस पडलं. हा तरुण मूळचा कोल्हापूरचाच. मुंबईत एका प्रथितयश जाहिरात संस्थेत अनेक वर्षे काम केल्यानंतर आपल्या गावात राहून आपल्याला भावणाऱ्या विषयांवर काम करावं हा ध्यास घेतलेला. त्याचं नाव सचिन सूर्यवंशी. कोल्हापूरकरांचं अलौकिक फुटबॉलप्रेम हा विषय घेऊन त्यानं माहितीपट बनवला, ‘द सॉकर सिटी’. या माहितीपटाला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. या पुरस्कारानं त्याचा आणि त्याच्या साथीदारांचा हुरूप वाढला. त्यानंतर अचानक त्याच्यासमोर विषय आला तो म्हणजे मर्दानी खेळ, अर्थात ‘शिवकालीन युद्धकला’. आपल्या चिकित्सक स्वभावाला अनुसरून सचिननं त्या विषयाच्या अभ्यासात स्वतःला झोकून दिलं. या विषयावर एक सखोल माहितीपट करण्याची गरज आहे, हे त्याला जाणवलं. मग या विषयाशी संबंधित वाचन, संशोधन, त्यातील तज्ज्ञ व्यक्तींच्या भेटीगाठी अशी सगळी तयारी करून कामाला सुरुवात झाली. पाठीशी कुणी मोठा निर्माता किंवा आर्थिक पाठबळ नसलं तरी प्रचंड ध्यास आणि मित्रांचा मदतीचा हात या भांडवलावर काम सुरू झालं. मर्यादित साधनं, विशेषतः आर्थिक मर्यादा लक्षात घेत काटेकोर नियोजन करून काम करणं आवश्यक होतं.

काही गोष्टी चित्रित करण्यासाठी मोठा कॅमेरा आवश्यक असला तरी सतत कॅमेरा भाड्यानं घेणं परवडणार नाही, हे लक्षात घेऊन काही भाग हा मोबाइल फोनचा कॅमेरा वापरून शूट करायचं ठरलं. अर्थात मोबाइलचा कॅमेरा आणि विशेषतः माईक यांच्या मर्यादा हे महत्त्वाचं आव्हान पेलायचं होतं. हा माहितीपट असला तरी फक्त लोकांच्या मुलाखती घेऊन आणि शस्त्रांची छायाचित्रं टाकून विषय संपवायचा नव्हता. शस्त्रं चालवतानाचे शॉट्स, त्यामागील सुरसरम्य कथा सांगणारी मंडळी, मर्दानी खेळ शिकवणारे वस्ताद, शिवाय या खेळाचा इतिहास, त्यात शिवरायांपासून महाराणी ताराराणी ते राजर्षी शाहू महाराज या सर्व थोर व्यक्तींचं योगदान असा खूप मोठा पट मांडायचा होता; तोही मर्यादित कालावधीत आणि परिणामकारक पद्धतीनं. यातील काही भाग (उदा. शिवरायांच्या मावळ्यांचे प्रसंग, त्यांची मनःस्थिती) हा काल्पनिक (फिक्शन) पद्धतीनं दाखवायचं ठरलं; तर जिजाऊंपासून बाजीप्रभू देशपांडे यांच्यापर्यंत पराक्रमाच्या गाथा निमेशनच्या माध्यमातून मांडायचं ठरलं.आणि एक दिवस अचानक मला सचिनचा फोन आला. ‘मी सध्या एका माहितीपटावर काम करत आहे. आपण दोघांनी एकत्र काम करावं, अशी अनेक वर्षांपासूनची इच्छा आहे. या माहितीपटात शस्त्रांचे आवाज आणि एकूणच ध्वनीची महत्त्वाची भूमिका आहे. तेव्हा तू हे काम करावंस असं मला वाटतं.’ त्याआधी मी सचिनशी माझी फक्त एकदाच भेट झालेली. पण एका भेटीतच आमचे सूर जुळलेले. त्याच्यासोबत काम करण्याची संधी मलाही हवीच होती...मग ‘वारसा’च्या साऊंडवर चर्चा झाली. माहितीपटात दिसणाऱ्या सर्व शस्त्रांचे आवाज रेकॉर्ड करायचे होते, त्याशिवाय फिक्शन, निमेशन भागांसाठी ध्वनीसंयोजन करायचं होतं. शस्त्रांचे आवाज रेकॉर्ड करणं हे वरकरणी सोपं वाटलं, तरी प्रत्यक्षात आव्हानात्मक काम आहे. मर्दानी खेळासाठी वापरली जाणारी अस्सल शस्त्रं, ती चालवता येणारे जाणकार, आजूबाजूला कसलाही गोंगाट नसलेली शांत जागा, हे आवाज रेकॉर्ड करण्यासाठी योग्य साऊंड इक्विपमेंट (उत्तम रेकॉर्डर आणि दर्जेदार स्टीरिओ माईक) अशी सर्व जुळणी करून कामाला सुरुवात केली.

कोल्हापूरजवळ असलेलं सव्यसाची गुरुकुल हे एक भन्नाट ठिकाण आहे. तिथे मर्दानी खेळ आणि एकूणच भारतीय खेळांविषयी शालेय वयापासूनच विद्यार्थ्यांना सर्वांगीण प्रशिक्षण दिलं जातं. तिथले प्रमुख लखन जाधव हे या विषयातले केवळ जाणकार नव्हे, तर या विषयाला वाहून घेतलेले समर्पित अभ्यासक आहेत. त्यांनी आम्हांला सर्व शस्त्रांचा परिचय करून दिला आणि त्यांचे आवाज योग्य प्रकारे रेकॉर्ड करण्यात मोलाची मदत केली. हे काम माझ्यासाठी खरोखर संस्मरणीय ठरलं. तलवारीचं धारदार पातं जेव्हा माईकपासून दोन इंचावरून हवा कापत जातं, किंवा पट्ट्याच्या लवलवत्या पात्यानं जेव्हा निमिषार्धात लिंबाचे दोन भाग होतात, तेव्हा हेडफोन्समध्ये ऐकू येणारा आवाज एकाच वेळी सुखावणारा, अंगावर काटा आणणारा आणि धडकी भरवणारा असतो!अशा प्रकारे शस्त्रांचे आवाज ‘ऑथेंटिक’ पद्धतीनं रेकॉर्ड करता आले. ते माहितीपटात योग्य प्रकारे लावण्याच्या कामात माझा सहकारी उमाकांत जगताप यानं मदत केली. माहितीपटाला डॉ. शरद भुताडिया यांच्यासारख्या मातब्बर कलाकाराच्या आवाजात निवेदन मिळालं. तर आमचा मित्र सुविख्यात संगीतकार आणि संगीतसंयोजक अमित पाध्ये यानं समर्पक असं पार्श्वसंगीत दिलं. या संगीतातून तो काळ आणि माहितीपटामागील विचार दोन्ही यथायोग्य रीतीने पोहोचतात. शेवटी या सर्व गोष्टी एकत्र करून त्याचे सुयोग्य मिश्रण (मिक्सिंग) करणं, ही आनंददायी प्रक्रिया म्हणजे शेवटचा टप्पा!यथावकाश माहितीपट तयार झाला आणि अल्पावधीतच त्याला ‘फिल्मफेअर’ पुरस्कार मिळाला! सर्वांना आनंद झाला. मात्र मनातून वाटत होतं, की याला राष्ट्रीय पुरस्कार मिळायला हवा, इतका महत्त्वाचा विषय मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचायला हवा. आणि तेही घडलं! गेल्या आठवड्यात जाहीर झालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये ‘वारसा’ला ‘नॉन-फीचर’ प्रकारात ‘कला आणि संस्कृती यावरील सर्वोत्कृष्ट लघुपट’ हा बहुमान मिळाला. या मातीतल्या, महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासातल्या एका महत्त्वाच्या विषयावरील माहितीपट राष्ट्रीय पातळीवर नावाजला गेला. मनापासून, झोकून देऊन फिल्म बनवणाऱ्या सचिनच्या आणि आमच्या संपूर्ण टीमच्या मेहनतीचं चीज झालं. आता सचिननं हाती घेतलेल्या इतर प्रकल्पांचं काम पूर्णत्वास जायला या पुरस्कारानं बळ मिळेल, अशी आशा आहे.मुख्य म्हणजे, या माहितीपटातून ज्या शिवकालीन युद्धकलेची अर्थात मर्दानी खेळाची सद्यस्थिती मांडली आहे, त्या खेळाला ऊर्जितावस्था मिळावी हीच यानिमित्ताने प्रार्थना. शालेय अभ्यासक्रमातील क्रीडाप्रकारांमध्ये या मर्दानी खेळाचा समावेश व्हावा, ही आम्हा सर्वांची इच्छा असून सचिनचे त्या दृष्टीनं प्रयत्न देखील सुरू आहेत. ते ज्या दिवशी घडेल, त्या दिवशी हा माहितीपट आणि त्याला मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार खऱ्या अर्थानं सत्कारणी लागेल.

# आदरांजली भिमरायाला...
# भावांजली विश्वरत्नाला



विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या विश्वव्यापी कार्याचा सुक्ष्म आढावा

करोडो भारतीयांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवून आणणार्या नेत्यांमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान विश्वस्तरीय आहे.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कोटी-कोटी भारतीयांचे अंधकारमय जीवन लक्ष-लक्ष किरणांनी प्रकाशित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर द्वारा लिखित भारतीय राज्यघटनेमुळे आज भारत देश एकात्मिक,अखंड असुन भारत देश एक संघ आहे तसेच राज्यघटनेतील तरतुदीमुळेच भारतात कधीही हुकूमशाही आली नाही. बाबासाहेबांनी प्रत्येक भारतीयांच्या विकासासाठी समान संधी आणि मुलभूत अधिकार देवून देशाला प्रगतीपथावर नेण्यात मोलाचा वाटा उचलला आहे.

राज्यघटनेतील मूलभूत हक्क,कर्तव्ये, त्रिस्तरीय पंचायत राज मधून सर्वसामान्यांना सत्तेत सहभागीत्व, वंचितांना संधीची उपलब्धता, राज्य आणि केंद्र यामधील सुयोग्य समन्वय ही राज्यघटनेची उपायुक्तता वाढविणारी आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यघटनेतील कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या कलमांमुळेच देशात शांतता आणि सुरक्षितता आहे,अन्यथा विविध धर्मीय-जातीय-पंथीय मतभिन्नता असलेला देश केंव्हाच सीरिया प्रमाणे अराजक,अफगाणिस्थान प्रमाणे तालिबानी झाला असता.आपल्या देशात अराजकता निर्माण झाल्यास देशात किती भयावह स्थिती निर्माण होईल,याचा विचारही गर्भगिळीत करणारा वाटतो.देशात शांतता, सुरक्षितता आणि अखंडता कायम आहे ती विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळेच! सामाजिक जीवनात २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभा ,१९२७ रोजी चवदार तळ्याचा सत्याग्रह ,१९३०रोजी नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहातून अस्पृश्यांमध्ये स्वसन्मानाची ज्योत जागवली.बाबासाहेबांनी ८ जुलै १९४५ रोजी पिपल्स एज्युकेशन सोसायटी ची स्थापन करून करोडो बहुजनांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजुर पक्ष ,१९ जुलै १९४२ रोजी शेड्यूल कास्ट फेडरशन आणि १९५५ ला प्रस्तावित रिपब्लिकन पक्षाद्वारे राजकीय क्षेत्रात पायाभरणी केली.१४ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसह धर्मांतर करताना बाबासाहेबांनी समतावादी , मानवतावादी ,विज्ञानवादी बौद्ध धम्म भारतात पुर्नस्थापित करून देशातील संभाव्य धार्मिक यादवी टाळली.

भारतीय अर्थव्यवस्थेला मार्गदर्शक ठरणारे अर्थशास्त्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते हे आज आपल्या लक्षात आले पाहिजे तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांच्या-स्त्रीयांच्या हक्कासाठी १९५२ साली आपला कायदेमंत्री पदाचा राजीनामा देणारे डॉ बाबासाहेबच होते,२४ तासापैकी २० -२० तास अध्ययन करून विद्येची अखंड सेवा करणारे आंबेडकर ,राज्यघटनेच्या ४५ व्या कलमान्वये १४ वर्षाखालील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करणारे शिक्षणतज्ञ म्हणजे डॉ.आंबेडकर,मूकनायक,बहिष्कृत भारत,जनता,प्रबुद्ध भारत सारखे समाजमन पेटविणारे वृत्तपत्र चालविणारे एक झुंजार पत्रकार ,जगातील सर्वात मोठ्या संसदीय शासन प्रणालीचे प्रणेते ,एक जहाल अभ्यासू वक्ता , शेकडो वैचारिक पुस्तके लिहणारे एक मर्मभेदि जागतिक दर्जाचा लेखक ,भारतीय जलनीतीचे संकल्पक आणि कुटुंब नियोजनचे प्रवर्तक , शेतकरी-शेतमजूर-कामगारांचे नेते, धार्मिक,सामाजिक , आर्थिक,राजकीय, शैक्षणिक,कृषी,आद्योगिक साहित्यिक क्षेत्रात अत्युच्च कार्य करणारा यशस्वी नेता म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही न संपणारी विश्वव्यापी कार्याची यादी आहे.

संपूर्ण भारतीयांसाठी आपले जीवन चंदनासम झिजविणाऱ्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ६८ व्या महापरिनिर्वाणा निमित्त भावपूर्ण आदरांजली ! मुंबईच्या अरबी समुद्राच्या किनारी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अंत्यविधी लाखो डोळ्यातून वाहणाऱ्या अश्रूंच्या आणि लाखो विदीर्ण हृदयातून उठणाऱ्या कंपनाच्या साक्षीने पार पडला.चैत्यभूमीला स्पर्श करणाऱ्या अरबी सागराला भावनिक साद घालतांना भीमकवी प्रल्हाद शिंदे लिहतात,

अरे सागरा,अरे सागरा !  
भीम माझा इथे निजला,शांत हो जरा !!

**-श्री बाजीराव नवनाथ ढाकणे**  
**मो ९४२१९८९९०९**

# दिलखुलास देश -’फ्रान्स’



मी मूळचा नगर जिल्ह्यातील श्रीरामपूरचा आणि अस्सल मराठी कुटुंबात लहानाचा मोठा झालेला. माझेही बालपण चारचौघांप्रमाणेच गेलेले आहे. अभ्यासात मी बरा होतो आणि नेमून दिलेले काम पूर्ण करायचेच, हा माझा स्वभाव होता. या माझ्या स्वभावानुसार पुरेसा अभ्यास करून मी ‘वाइन टेक्नॉलॉजी’मध्ये पदवी घेतली आणि त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी ‘एमबीए मार्केटिंग’चा पर्याय निवडून पार पाडला. पदव्युत्तर शिक्षण घेऊन नोकरी करायची वेळ आल्यावर लक्षात आले, की मी ज्या वाइन उत्पादन क्षेत्रात काम करू इच्छित आहे, त्या क्षेत्रात एमबीए मार्केटिंग केल्यावर मला फक्त सरोगसी मार्केटिंग म्हणजेच ‘अप्रत्यक्ष जाहिरात’ (उदा. ‘इंपीरिअल ब्लू - मेन विल बी मेन’) करावी लागणार होती आणि ते मला अजिबातच रुचणारे नव्हते. कारण भारतात वाइन किंवा लीकर उत्पादनांची थेट जाहिरात करण्यास बंदी आहे. त्यामुळे मग वाइन उत्पादन क्षेत्रात काम करावे, हा विचार मनात डोकावू लागला. त्यासाठी वाइन उत्पादनातील उच्च शिक्षण घेणे अपरिहार्य आहे आणि भारतात एकही संस्था वाइन उत्पादनातील उच्च शिक्षण देणारी नाही, ही बाब समोर आली. खरे सांगतो, उच्च शिक्षणाचा विचार करेपर्यंत, परदेशात शिकायला जाऊ, तिथे सेटल होऊ, असे एकही स्वप्न मला केव्हाही पडलेले नव्हते. पण आता पर्यायच नव्हता. त्यामुळे २००१मध्ये मी जगभरात वाइन कॅपिटल म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या फ्रान्समधील बोर्दो येथे जाण्याचा निर्णय घेतला. बोर्दोला कॉलेजमध्ये गेल्यावर पहिल्यांदा धक्का बसला तो शिक्षकांमधील नाते पाहून. एकमेकांना नावाने हाक मारणारे शिक्षक असतात, हेच मुळी मला नवीन होते. इथले शिक्षक सगळ्या विद्यार्थ्यांना छान समजून घेऊन समजून सांगून पुढे नेत. कोणीही कुठलीही संकल्पना मांडो, शंका विचारो, त्याची उत्तरे देण्यासाठी शिक्षक तत्पर होते. प्रयोग करायला वाव होता. सुरुवातीच्या काही दिवसांनी इथे अर्थार्जनाची व्यवस्था पाहणे भाग असल्याने मी स्कॉलरशिपसाठी अर्ज केला. पण स्कॉलरशिप फक्त फ्रेंच विद्यार्थ्यांसाठी असल्याचे समजल्यावर, आता काय? असा प्रश्न आ वासून समोर उभा राहिला. त्या वेळी माझ्या शिक्षकांनी मला इंग्रजी शिकवण्याचा पर्याय सांगितला. त्या शिकवण्याच्या बदल्यात माझा खर्च भागेल इतकी रक्कम मला कॉलेजने स्टायपेंडच्या रूपात उपलब्ध करून दिली. स्वातंत्र्य आणि मुक्त वातावरण, आनंद किंवा लक्झरी या फ्रान्सच्या मातीत रुजलेल्या गोष्टी आहेत.या देशात जे आहे ते निगुतीने जोपासून त्यातून उत्पन्न कसे मिळेल, कसे वाढेल आणि त्याचा देशाला कसा उपयोग होईल, याचा काटेकोर विचार केला जातो. हा विचार इथल्या नागरिकांमध्ये रुजावा यासाठी अगदी शाळेपासून सरकार लक्ष देऊन असते. माझ्या कॉलेजचेच उदाहरण सांगतो. इथे वाइन उत्पादन शिकणारे विद्यार्थी उद्या व्यवसाय जगतात जाणार आहेत, हे लक्षात घेऊन दर चार महिन्यांनी प्रकल्पभेटीचे आयोजन करून तिथे प्रत्यक्ष काम करण्याची संधी दिली जाई. कॉलेजची स्वत:ची वाइन डिस्टिलरी आहे. स्वत:चा ब्रँड आहे. इथे विद्यार्थी उत्पादन, ब्रँडिंग, पॅकिंग अशा विविध कामांचा अनुभव घेतात. चोख काम करा. त्या करताना चुका झाल्या तर होऊ देत. त्यातून तुम्ही शिका, असा इथल्या खाक्या आहे. एक कॉलेज संपल्यावर एका वाइन कंपनीत इंटर्नशिप करण्याची संधी मिळाली. दीड वर्ष त्या कंपनीत झोकून देऊन काम केले. ‘प्रोफेशनल’ म्हणून काम करण्यासाठी मला इथल्या अनुभवांनी प्रचंड बदलून टाकले. मला इंग्रजी बोलता येत असे. सगळ्या भारतीयांप्रमाणे एकाच वेळी चार कामे करण्याचे कौशल्यही होते. त्यामुळे कंपनीच्या उत्पादन, विक्री, जाहिरात आणि अर्थ अशा सगळ्या विभागांत काम केले. हे बघून कंपनीच्या मालकाने अधिकाधिक कामे विश्वासाने माझ्यावर सोपवली आणि गुणवत्तेचे योग्य चीज होणे म्हणजे काय, याचा खराखुरा अनुभव दिला. इथे व्यक्तीच्या कामाला जोखतात. त्याच्या क्षमतांचे कौतुक केले जाते, हा अनुभव मला मिळाला.शिक्षण, नोकरी यासह फ्रान्समधील मित्रमैत्रिणींसह जुळवून घेणे हाही एक भाग होता. हे सारे जण अतिशय स्वतंत्र आणि स्पष्ट; पण दिलखुलासपणे जगणारे होते. त्यांच्यासोबत राहताना येणाऱ्या अनुभवांनी मला विचारांची स्पष्टता द्यायला सुरुवात केली आणि प्रत्येक गोष्टीचा म्हणजे अगदी नात्यांपासन ते प्रोफेशनल कामांच्या पद्धतींपर्यंत सगळ्याचा नव्याने विचार करायला भाग पाडले.या सगळ्या मित्रमैत्रिणींनी मला तिथल्या आचारविचारांशी सहजपणे मला कोणताही न्यूनगंड न देता, चेष्टा न करता परिचय करून दिला. अगदी साध्या गोष्टींचेही मला प्रश्न पडत. काटा-चमच्याने खाता येत नसे. सलाड किंवा चिकन काटा-चमच्याने कसे खायचे, हेच समजेना. काटाचमच्याने खाण्यासाठी बरेच दिवस खटपट करावी लागली. अखेरीस प्रयत्नांनी ते जमले, म्हणजे खरे तर जमवावे लागले. तीच गोष्ट वागण्या-बोलण्याचीही. भारतात सहज होणाऱ्या गोष्टी इथे अगदी अमान्य होत्या. मी पेइंग गेस्ट म्हणून राहत होतो, त्या आजीशी माझी छान मैत्री झाली. तिच्याशी गप्पा मारताना फ्रेंच संस्कृती आणि फ्रेंच माणसाचे राहणे-वागणे मला अधिक उलगडत गेले. ‘फ्रान्समध्ये आपण जे कपडे घालतो, त्या एकूण एक कपड्यांना इस्त्री केली जाते आणि तूही ते कर’ असे ‘बहुमूल्य’ ज्ञान तिने मला दिले. नुसते दिले नाही तर माझ्या एकूण एक कपड्यांना स्वतः इस्त्रीही करून माझ्या ‘फ्रेंच’ होण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकायला लावले. माझ्या सगळ्या फ्रेंच मित्रमैत्रिणींच्या मनात भारताविषयी असंख्य प्रश्न होते. भारतात हत्ती, घोडे, सिंह आहेत ना? भारतात गरिबी प्रचंड का आहे आणि मग तुमचे सरकार काही करीत नाही का? तुमच्याकडे जातिभेद प्रचंड आहे का? महात्मा गांधी आणि इंदिरा गांधी यांना का मारले अशा कित्येक प्रश्नांच्या फैरी फ्रेंच मित्रमंडळी माझ्यावर करू लागली होती. इतिहासाचा सखोल अभ्यास मी या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी फ्रान्समध्ये गेल्यावर केला. ही मंडळी माझ्या घरी येत. मी आमटी भात करून खात असे. त्या वेळी फ्रेंच मित्रमंडळींनी ‘तू फार मसालेदार जेवतोस. तुझ्या घरी आले की ‘करी’चा वास येतो. तू आमच्या सोबत गाडीत आलास तरी ‘करी’चा वास येतो’ असे म्हणून त्यांनी माझ्या घराला ‘करी हाउस’ असे नाव देऊन टाकले होते. यावर काय प्रतिक्रिया द्यावी ते मला कळतच नसे आणि मग हसून गप्प बसत असे. पुढे गाडी घेतली. इथले वाहतुकीचे नियम वेगळे. कार लेफ्ट हँड ड्राइव्ह. ड्रायव्हिंग, ओव्हरटेकिंगच नव्हे, तर रस्त्यावरून गाडी चालवताना माझी गडबड उडायला लागली. शेवटी मराठीमध्ये वाहतुकीचे नियम लिहून गाडीत चिकटवून टाकले. गाडीत बसलो, की आधी नियम पाहायचे असे सुरू केले. मग कुठे गाडी रूळावर आली. दुसरा प्रश्न होता वेळेचा. इथे उन्हाळ्यात सकाळी पाच वाजता सूर्य उगवतो आणि सूर्यास्त रात्री ११ वाजता होतो. दिवस १७ तासांचा आणि रात्र अवघी सहा-सात तासांची. रात्रीचे ११ वाजले तरी सूर्य मावळत नाही, हे माझ्यासाठी नवलाचे होते. अतिप्रचंड उन्हाळा किंवा अतिप्रचंड थंडी इथे नाही. सूर्यप्रकाश असणारा इतका मोठा दिवस असल्याने इथे झाडांची उत्तम आणि भराभर वाढ होते. त्यामुळे निसर्ग समृद्धता विपुल आहे. याचा फायदा वाइन उद्योगाने पुरेपूर करून घेतला आहे. मुळात वाइन शोधली रोमन लोकांनी. कालांतराने ते उत्तर युरोपात आले. आधीच दिलखुलास जगणाऱ्या फ्रेंचांनी आपल्याला मिळालेल्या नैसर्गिक देणगीचा वापर करून वाइन उद्योग इथे रुजवला, वाढवला आणि जगभरात नावाजला जावा यासाठी कष्ट घेतले. त्यासाठी शेतीत प्रयोग केले. फ्रेंचांनी वाइनला प्रतिष्ठा दिली. व्यवसायवृद्धीतून त्यांनी जीवनमान, जीवनशैली अधिक समृद्ध व्हावी, व्यवसायाचा फायदा देशाला व्हावा यासाठी नियोजनबद्ध कष्ट केले. वाइन उत्पादन शिकताना या गोष्टींची नोंद मनात होत होती. यातून माझ्या मनात वाइन उद्योग भारतात कसा रुजवता येईल, त्यासाठी काय करावे लागेल याची चक्रे सुरू झाली. त्यातूनच पुढे वाइन पॉलिसीचा प्रस्ताव मनात रुजला.

# खा.रजनीताई पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

## वृक्षारोपण वक्तृत्व,निबंध,रांगोळी स्पर्धा, विद्यार्थ्यांना फळ वाटप





**केज । प्रतिनिधी**

राज्यसभेच्या खासदार काँग्रेसच्या नेत्या
केज ,माऊली विद्यापीठाच्या संस्थापक खा रजनीताई अशोकराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माऊली विद्यापीठ अंतर्गत विविध शाळा महाविद्यालयात , , विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, खाऊ वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.

संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे यांच्या नियोजनातून विविध उपक्रम घेण्यात आले.

प्राथमिक माध्यमिक विद्यालय उमरी येथे विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. रामराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात निबंध स्पर्धा घेण्यात आली. वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना फळे वाटप करण्यात आली .सरस्वती कन्या प्रशाळेत रांगोळी स्पर्धा,फळे वाटप करण्यात आले. राजीव गांधी माध्यमिक विद्यालयात स्वच्छता मोहीम व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप. महिला कला महाविद्यालय कडून वृद्धाश्रमात नागरिकांना किराणा साहित्य भेट. माऊली प्राथमिक विद्यालय बीड निबंध स्पर्धा व सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. प्रमिला देवी पाटील कला महाविद्यालयाच्या आपला परिवार वृद्धाश्रमात किराणा भेट देण्यात आला

केज येथील आदर्श प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. सरस्वती महाविद्यालय, भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय, महाविद्यालयाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.

अनावश्यक खर्च टाळून सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ जी बी पाटील, मुख्याध्यापक ए बी गोरे, प्राचार्य विजय शिनगारे, डॉ हनुमंत सौदागर, मुख्याध्यापिका सविता घुले,मुख्याध्यापक श्री खोसे, मुख्याध्यापक राम कांबळे,सहशिक्षक विलास भिसे ,मुख्याध्यापक संदीप सत्वधर आदींच्या नियोजनातून उपक्रम घेण्यात आले. कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.


# केज तालुक्यातील बीएसएनएलच्या सेवेचा बोजवारा–दिनकर जाधव

## ग्राहक वेठीस : टॉवर आसून ओळंबा नसून खोळंबा

**बीड । प्रतिनिधी**

भारत संचार निगम लि. ही भारत सरकारची कंपनी आहे. कनेक्टिंग इंडिया हे ब्रिद घेऊन कंपनीने बाजारात आपले स्थान पक्के केले. ग्राहकांनीही भारत सरकारचे कंपनी म्हणून अधिक पसंती दिली आणि बीएसएनएल ही प्रथम पसंतीचे दूरसंचार कंपनी बनली. भारत सरकारनेही स्वच्छ प्रमाणिक हेतू ठेवत खेड्या–पाड्या पर्यंत बीएसएनएलचे नेटवर्क पोहोचवण्याचे काम केले. परंतु आता या कंपनीला कोणाची दृष्ट लागली ही कंपनी आता नेटवर्क देण्यास असमर्थ ठरत आहे.

ज्यावेळेस मोबाईल सुरुवात झाली आणि सर्व खेड्यापाड्यापर्यंत नेटवर्कचा विषय आला. त्यावेळेस बीएसएनएल या भारत सरकारच्या कंपनीने अगदी दऱ्याखोऱ्यापर्यंत नेटवर्क पोहोचवण्याचे काम केले आणि सर्वांना कनेक्ट करण्यात सिंहाचा वाटा उचलला. परंतु आता अगदी हायवेलगत असलेले टॉवरही धुळ खात पडून आहेत. यामुळे अनेक गावातील बीएसएनएल ग्राहकांनी आपले सिम कार्ड पोर्ट करत दुसरी कंपनी निवडली आहे. त्यातच केज (जि.बीड) तालुक्यातील बीएसएनएलची नेटवर्क सुविधेचा बोजवारा उडाला आहे. अगदी टॉवर असलेल्या गावातही नेटवर्क बंद अवस्थेत असल्याचे पहावयास मिळत आहे. तालुक्यातील लाखो ग्राहकांची हेळसांड होत आहे. या ग्राहकांचे लाखो रु.चे रिचार्ज वाया जात आहेत. त्यामुळे बीएसएनएलच्या मोडखाळीस आलेल्या सेवेला येथील अधिकारी आणि कर्मचारी कारणीभूत तर नाहीत ना ? अशी शंका ग्राहकांना येत आहे. अनेक गावातील टॉवर बंद असल्यामुळे टॉवर आसून ओळंबा आणि नसून खोळंबा अशी अवस्था या कंपनीची झाली आहे. त्याचबरोबर केज तालुक्यातील सर्व टॉवर सुरु करुन त्यावर ५ॠ नेटवर्क सेवा सुरु करण्याची मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. बीएसएनएल मोबाईल सेवा जेव्हापासून अस्तित्वात आली तेव्हापासून अनेक लाखो ग्राहक जोडलेले आहे. परंतू अधिकार्यांच्या मनमानी आणि निष्क्रिय धोरणामुळे ग्राहकांना सेवा सुरुळीत मिळत नाही असे मत पत्रकार दिनकर जाधव केज यांनी मांडले आहे.






# दिव्यांग बांधवांसाठी कोल्हे कुटुंबांचे उल्लेखनीय कार्य

**कोपरगांव । प्रतिनिधी**

दिव्यांग बांधवांच्या उत्कर्षासाठी केंद्र व राज्य शासनाने असंख्य योजना काढल्या असुन माजी आमदार सौ. स्नेहलता कोल्हे व युवानेते विवेक कोल्हे यांनी त्याचा तळागाळातील बांधवांना लाभ मिळवून देण्यांसाठी जाणिवपुर्वक प्रयत्न केले आहेत, तेंव्हा तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी संघटीत व्हावे असे प्रतिपादन कोपरगांव तालुका भारतीय जनता पक्ष दिव्यांग सेलचे तालुकाध्यक्ष मुकुंद काळे यांनी केले.

कोपरगांव शहर व तालुका भारतीय जनता पक्ष कार्यालय व माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या कोपरगांव शहरातील संपर्क कार्यालयात जागतिक दिव्यांग दिनानिमीत्त बैठक आयोजित करण्यांत आली होती त्यात ते बोलत होते. यावेळी मुकबधीर विद्यालयाचे सामाजिक कार्यकर्ते श्री. डुकरे सर यांनी दिव्यांग बांधवांना मार्गदर्शन केले. श्री. मुकुंद काळे पुढे म्हणाले की, सन १९९१ पासुन माजीमंत्री स्व. शंकररावजी कोल्हे यांनी दिव्यांगांसाठी चालविलेला सेवेचा रथ पुढे माजी आमदार स्नेहलता कोल्हे, सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी सहकारी साखर कारखान्यांचे युवा अध्यक्ष विवेक भैय्या कोल्हे यांनी मोठ्या प्रमाणांत वस्तुच्या रूपात मदत करून त्यांच्या प्रत्येक समस्या सोडविण्यांसाठी काम सुरू ठेवलेले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अपंगावजी दिव्यांग शब्दाचा वापर व्हावा म्हणून काम केले.

जेव्हा समाजातील धडधाकट व्यक्ती दिव्यांगांना आधार देईल तेंव्हाच त्यांचे जीवनमान उंचावेल त्यासाठी सर्व बाजुनी प्रयत्न व्हावेत. यावेळी दिव्यांग बांधवांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यांत आले. कोपरगांव आगाराचे प्रमुख श्री. बनकर यांच्याकडे यावेळी दिव्यांग बांधवांना बसमध्ये आरक्षीत सीटवर प्रवास करण्यांत इतर प्रवासी सहकार्य करत नाही त्याबाबत सर्व वाहकांना सुचना देवुन ग्रामिण भागात दिव्यांग थांबा निर्माण करण्यांत यावा या आशयाचे निवेदन देण्यांत आले. याप्रसंगी सर्वश्री. चांगदेव मैंद, दत्तात्रय धाकतोडे, जाकीरभाई शेख, ओम आहेर, कल्पना बुचकुले, ज्योती पठाडे, पुष्पा बंड, अशोक गागरे, मनिषा पवार, गंगुबाई वायकर, अलका कुचेकर, पवन शिंगी, शाम आहेर आदि दिव्यांग बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कोपरगांव तालुका दिव्यांग संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष स्व बाळासाहेव आढाव यांनी तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती सचिव जयवंत मरसाळे यांनी यावेळी दिली. शेवटी अध्यक्ष स्वप्नील कडु यांनी आभार मानले.




## बिबट्यासह वन्य प्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या जीवितास धोका

# कृषी पंपाला दिवसाचा विजपुरवठा करा अन्यथा तीव्र आंदोलन करू–राजेभाऊ फड

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

स्वतःचा जीव धोक्यात घालत अवघ्या जगाचे पालनपोषण करणाऱ्या बळीराजाच्या भोवती अनेक संकटे घोंगावत असतात. कधी कृत्रिम अडचणी येतात तर कधी कधी नैसर्गिक धोके निर्माण होतात. परळी तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्यासह अनेक वन्य जीवांचा मुक्त वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांच्यापासून हल्ले होण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. त्यामुळे वारंवार संकटाशी खेळणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने दिवसाचा विजपुरवठा करावा जेणेकरून त्याचयावरील अपघाताचे घोंगावणारे संकट दूर होऊ शकेल. शासनाने आणि विजवितरण कंपनीने याचा गंभीर्यपूर्वक विचार करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे.



अस्मानी आणि सुलतानी संकटाचा नेहमीच शेतकऱ्यांना सामना करावा लागतो. कमी असलेला हमीभाव, कधी दुष्काळ तर काढू अतिवृष्टी अशा या ना त्या कारणाने नेहमीच संकटे घोंगावत असतात. त्यातच शासनाने आता रात्रीचा विजपुरवठा सुरु केला आहे. रात्रीच्या वेळी वन्य प्राण्यांचा वावर असतो. साप, विंचू, रानडुक्कर तसेच काही ठिकाणी बिबट्याचा मुक्त संचार असल्याच्या घटना निदर्शनास येत आहेत. त्यांच्यापासून शेकऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. अशातच रात्रीच्या वेळी पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेलेल्या शेतकऱ्यांवर ते हल्ले करत असल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यात अनेकांना आपला आपला जीव गमवावा लागला तर अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. या घटना टाळव्यात यासाठी शासनाने दिवसा विजपुरवठा करावा अन्यथा महावितरण कंपनीच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

# केज–बीड रोडवर आढळले अनोळखी पुरुषाचे प्रेत:पोलिसांचे ओळख पटविण्याचे आवाहन

**गौतम बचुटे । केज**

केज येथे केज–बीड रोडवर, पोलीस स्टेशन समोरील रोडवर दि. ४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६:०० वा. चे सुमारास एक पुरुष जातीचे अनोळखी प्रेत आढळून आले आहे. त्या प्रेताचे वर्णन पुढील प्रमाणे आहे. उंची ४ फूट ९ इंच, सावळा रंग, अंगात राखाडी रंगाचे स्वेटर आणि डोक्याला भगवा रुमाल. अशा अवस्थेत आढळून आले आहे. प्रेताची ओळख पटलेली नसून पोलिसांनी सदर प्रेत हे उपजिल्हा रुग्णालय केजच्या शवागृहात ठेवले आहे.

मयताच्या बाबतीत जर कोणाला काही माहिती असेल तर त्यांनी तात्काळ केज पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांच्याशी मोबाईल नंबर ९१६८२०३१९८वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी प्रा.संजय तुपे

**जालना । असलम कुरेशी**

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या पदाधिऱ्यांची बैठक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या अक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या सहमतीने हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी प्रा संजय तुपे यांची नियुक्ती केली.



याप्रसंगी राज्यात कुठेही पत्रकारांवर अन्याय झाल्यास हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशन पत्रकारांच्या समस्यांवर आवाज उठवणार असल्याचे प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी सांगितले.

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी प्रा संजय तुपे यांची नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी, प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रियाज शेख, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद महेबुब, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बालाजी अडियाल, प्रदेश महासचिव विनोद भोकरे, महाराष्ट्र प्रदेश सचिव जावेद पठाण (भोकरदन), विदर्भ प्रवक्ता सय्यद जावेद, महाराष्ट्र प्रदेश मिडिया प्रभारी अमजद पठाण, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य राम कोडवते, उमेश गोधने, महेश भैराम, धनंजय तरारे, विदर्भ विभागीय अध्यक्ष मो. तारेक शेख, मराठवाडा विभागीय अध्यक्ष शेख वसिम आझाद, बुलढाणा जिल्हा अध्यक्ष मिर्झा अक्रम बेग, अमरावती जिल्हा अध्यक्ष मुबिन शेख, गोंदीया जिल्हा अध्यक्ष गौरव कुमार, वर्धा जिल्हा अध्यक्ष तनविर अशरफ, नागपूर जिल्हा उपाध्यक्ष आरती प्रजापती, बदनापूर तालुका अध्यक्ष इलियास बेग, अविनाश मेश्राम, प्रमोद डोंगरे आदिंनी त्यांचे अभिनंदन केले.

## खा.रजनीताई अशोकराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त

# माऊली प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व केळी वाटप संपन्न





**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर शहरातील शैक्षणिक क्षेत्रात उपक्रमशील माऊली प्राथमिक शाळेमध्ये खासदार रजनीताई अशोकराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व केळी वाटप करण्यात आले.

माऊली विद्यापीठ केजच्या संस्थापक अध्यक्ष खासदार रजनीताई अशोकराव पाटील यांचा वाढदिवस धारूर शहरांमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक क्षेत्रामध्ये अग्रस्थानी असलेल्या माऊली प्राथमिक विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना वही, पेन, खाऊ व केळी वाटप करण्यात आली .यावेळी मुख्याध्यापक रणजीत साळवे, सशिक्षिका निलभा तांबवे मॅडम, चाळक मॅडम, प्रशांत गवळी सर इत्यादी उपस्थित होते.

## घुंगराळा येथे खंडोबा यात्रेची जय्यत तयारी सुरू

# जंगी कुस्त्यांचे सामने,कृषी व पशु प्रदर्शन,सांस्कृतिक कला महोत्सव आदी कार्यक्रमांचे आयोजन-वसंत सुगावे पाटील

**घुंगराळा । प्रतिनिधी**

घुंगराळा ता. नायगाव येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही खंडोबा देवाची यात्रा होणार असून दरवर्षीप्रमाणे यंदाही यात्रेत जंगी कुस्त्यांचे सामने,कृषी व पशु प्रदर्शनाचे,सांस्कृतिक कला महोत्सव या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशसरचिटणीस तथा प्रभारी सरपंच वसंत सुगावे पाटील यांनी दिली आहे.शनिवार दिं.७ डिसेंबर रोजी यात्रा सुरू होणार असून याच दिवशी कुंटूर येथून खंडोबा देवाच्या पालखीचे घुंगराळा येथे दुपारी आगमन होईल व सायंकाळी ४.०० वा. खंडोबा मंदिरावर गावकऱ्यांच्या वतीने सामूहिक आंबील जेवणाचा कार्यक्रम होईल. दिं.८ डिसेंबर रोजी दुपारी १.०० वा. जि. प. हायस्कुल घुंगराळ्याच्या मैदानावर जंगी कुस्त्यांचे सामने होतील या सामन्यांचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते व अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमात होईल.या कार्यक्रमास जि. प. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी माळोदे साहेब,निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर ,जि. प. चे उपमुख्यकार्यकारी अधिकारी मुक्कावार साहेब,एम एस इ बी चे अधीक्षक अभियंता श्री. जाधव साहेब यांच्यासह अनेक विभागाचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहतील. दिं.८ डिसेंबर रोजीच सायंकाळी ७.०० वा कुस्त्यांचे सामने संपन्न होतील या सामान्यांचे बक्षीस वितरण पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप साहेब यांच्या हस्ते व पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार , अतिरिक्त जिल्हाधिकारी बोरगावकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. या कुस्ती स्पर्धेत वसंत सुगावे पाटील यांच्या तर्फे अखेरची मानाची खंडोबा केसरी कुस्ती होईल यात विजयी पहेलवानस २१,१११ रुपयांचे पाहिले बक्षीस राहील,तर यात्रा समितीच्यास वतीने द्वितीय बक्षीस११,१११ रु. व तृतीय बक्षीस ७,१११ रु. राहील.

दिं.९ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वा. कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन आ.प्रतापराव पा.चिखलीकर यांच्याहस्ते व आ. राजेश पवार यांच्या अध्यक्षतेखालील कार्यक्रमात होईल तर पशु प्रदर्शनाचे उद्घाटन खा. रवींद्र पा. चव्हाण यांच्या हस्ते व भाजपा नेते राजेश कुंटुरकर यांच्या अध्यक्षतेखालील कार्यक्रमात होईल. या कार्यक्रमास जिल्हा परिषदचे प्रकल्प संचालक तुबाकले साहेब, यांच्यासह जिल्हा परिषद, कृषी विभाग,पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी,विविध पक्षांचे राजकीय पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. दिं.९ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.०० वा.सांस्कृतिक कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.दिं.१० डिसेंबर रोजी रात्री ९.०० वा. खंडोबा देवाच्या पालखीचे कुंटूर कडे प्रस्थान होईल.यात्रेच्या पार्श्वभूमीवर गावात ग्रामपंचायतच्या वतीने साफसफाई, पाण्याचे नियोजन,दिवाबत्तीची व्यवस्था, यात्रेत येणाऱ्या दुकानदारांकरिता दुकाने मांडण्यासाठी चे नियोजन आदी कामे प्रामुख्याने करत आहेत.



# हिमायत फाउंडेशनच्या जनसंवाद मेळाव्याला युवकांचा प्रचंड प्रतिसाद

## अल्लाहने इंसान को दर्देदिल के वास्ते पैदा किया-मुफ्ती उमर कुरेशी

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई येथील हिमायत फाउंडेशन गेल्या अनेक महिन्यापासून सामाजिक क्षेत्रात कार्य असून आत्तापर्यंत फाउंडेशनच्या माध्यमातून गंभीर आजारांच्या अनेक गोरगरीब रुग्णांना लाखोंची मदत करण्यात आलेली आहे. हिमायत फाउंडेशनच्या वतीने शहरातील संजय नगर भागातील इस्लामपुरा चौकात जनसंवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी फाउंडेशनचे अध्यक्ष मुक्ती उमर कुरेशी, तर प्रमुख पाहुणे म्हणून मौलाना ताहेर इशाअती, हाफीज जहीर, मौलाना सलीम आदी मान्यवर उपस्थित होत. या जनसेवा जनसंवाद मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुक्ती उमर कुरेशी यांनी सर्व उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. अल्लाने इन्सान को दर्देदिल के वास्ते पैदा किया है असे सांगून सध्याच्या स्थितीत समाजाच्या समस्या व त्यावरील उपाययोजनाबाबत त्यांनी लोकांना समजून सांगितले.




हिमायत फाउंडेशन चा उद्देश व आगामी काळात फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबाबत सविस्तर माहिती दिली. फाउंडेशनच्या स्थापनेपासून आतापर्यंत फाउंडेशनच्या वतीने गंभीर आजाराचे रुग्णांना आर्थिक मदत करणे असो किंवा शालेय व व महाविद्यालयीन विद्यार्थी - विद्यार्थिनींच्या समस्या असो समाजाच्या अशा विविध समस्या व प्रश्न फाउंडेशनच्या माध्यमातून मार्गी लावण्यात आले आहेत.

यापुढेही सामाजिक कार्यात हिमायत फाउंडेशन अग्रेसर असणार आहे. त्यामुळे फाउंडेशनला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आव्हान हिमायत फाउंडेशनचे अध्यक्ष मुक्ती उमर कुरेशी इशाअती यांनी केले आहे. या कार्यक्रमास फाउंडेशनचे उपाध्यक्ष सय्यद सोहेल, सचिव शेख मुजीब, सहसचिव सय्यद शाकेर, सदस्य सिरहान चाऊस पठाण साजिद, परवेज बागवान, सय्यद नवाज, ओम प्रकाश मुठाळ, जीशान पठाण, पठाण मुजाहिद खान,मोमीन मुजाहेद,शेख उबेद, अरबाज मोमीन, शेख जहीर,जिया चाऊस, सलमान चाऊस, अल्ताफ मोमीन, फाउंडेशनचे एडिटर शेख इजहार यांच्यासह संजय नगर भागातील सर्वस्तरावरील नागरिक आवर्जून उपस्थित होते.

# नेवाशात बनावट खत तयार करणाऱ्या गोडाउनवर छापा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील बनावट खत तयार करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या नेवासा बुद्रुक (ता. नेवासा) येथील एका बनावट खत तयार करणाऱ्या गोडाऊनवर छापा टाकून साडेसोळा लाख रुपये किमतीचे साहित्य जप्त केले आहे. पोलिस आणि कृषी विभागाच्या पथकाने सोमवारी (ता. २) उशिरा ही कारवाई केली. याबाबत संबंधितावर नेवासा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



नेवासा तालुक्यात बनावट खत तयार करून शेतकऱ्यांना विक्री करत असल्याची माहिती कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्या आदेशानंतर कृषी आणि पोलिस विभागाच्या पथकाने नेवासा बुद्रुक येथे सोमवारी (ता. २) जय किसान फर्टिलायझर अॅण्ड केमिकल्सच्या गोदामावर छापा टाकला.

या छाप्यात खताच्या भरलेल्या गोण्या, रिकाम्या गोण्या, शिलाई मशिन, दोरा बंडले, इन्व्हर्टर, खताचे तीन ढीग असा सुमारे १६ लाख ५० हजार रुपयांचे साहित्य आढळून आले. संबंधिताचे कृषी सेवा केंद्र असून, त्याच्याकडे घाऊक खत विक्रीचा परवाना असून त्यात उल्लेख असलेली खते आणि गोदामात उपलब्ध असलेली खते यात तफावत आढळून आली. तसेच खत उत्पादनाचा किंवा को-मार्केटिंगचा परवाना नाही.

तरीही बाहेरून कच्चा माल आणून त्याचे पॅकिंग करून विक्री करत असल्याचे आढळून आले. संबंधित खतही बनावट असण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या प्रकरणी पथकाने पंचासमक्ष पंचनामा केला असून गोदाम सील केले. पथकात कृषी अधिकारी प्रताप कोपनर, बाळासाहेब कासार, रखमाजी लांडे, राहुल ठोंबरे, प्रवीण देशमुख, दिलीप घोळवे आदींसह कृषी विभाग व पोलिस अधिकारी होते. अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ खत नियंत्रण आदेश १९८५ चे उल्लंघन केल्याने प्रताप कोपनर यांच्या फिर्यादीवरून नेवासा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. जिल्हा कृषी विभागाने अशा प्रकाराबाबत कडक भूमिका घेतल्याचे दिसत आहे.खते, बियाण्यांचे याआधीही नेवाशात काळ्या बाजारात बियाणे विक्रीचे प्रकार आढळून आले होते. आताही उघडपणे बनावट खताची विक्री सुरू होती. त्यामुळे नेवासा तालुक्यातील कृषी विभागाचे अशा प्रकारांकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

# सर्व सामान्यांचे लोकनायक आ.सुरेश धस यांना कॅबिनेट मंत्री करून बीड जिल्ह्याचे पालकमंत्री करावे-अॅड.प्रकाश कवठेकर

**पाटोदा । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वमान्य लोकप्रिय आमदार व्यक्तीमत्व म्हणुन सुरेश धस यांची ओळख आहे. गेली तीस वर्षाच्या राजकीय जिवनात त्यांनी आठरापगड जाती धर्माच्या लोकांना न्याय दिला आहे. अशा बहुआयामी आ. सुरेश धस यांना कॅबिनेट मंत्री करून बीड जिल्ह्याचे पालकमंत्री करावे अशी मागणी डोंगर किन्ही जि प सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते व प्रसिद्ध उद्योजक तथा ड प्रकाश दादा कवठेकर यांनी केली आहे.आ. सुरेश धस यांनी अनेक सामान्य कार्यकर्ते यांना पं.स.सभापती,जि.प.सदस्य.जि.प. अध्यक्ष नगराध्यक्ष , पक्षाची विविध पदे दिली आहेत. ही पदे देतांना कधीच जातपात पाहिली नाही. तळगळातील घटकांचा विचार करून पदे दिली. आष्टी मतदार संघातील आजपर्यंतच्या इतिहासात आ. सुरेश धस यांच्या एवढा विकासासाठी निधी कोणीही आणलेला नाही. या निवडणुकीत सर्व जाती धर्माचे लोक आ. सुरेश धस यांच्या मागे होतेच परंतु गरजवंत मराठा समाज पूर्ण तकदीने त्यांच्या मागे निवडणुकीत ऊभा होता हे विशेष आहे. आज पर्यंत बीड जिल्ह्याला मराठा समाजाचा पालकमंत्री लाभलेला नाही तेंव्हा विकासाभिम नेतृत्व आ. सुरेश धस यांना भाजपाने महाराष्ट्र राज्याचा मंत्री करुन बीड जिल्हा पालकमंत्री करावे अशी मागणी मराठा समाजाच्या वतीने करण्यात येत आहे. सत्ता आसो वा नसो आ. सुरेश धस हे सतत विद्यार्थी, सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, कर्मचारी व्यापारी, महिला इत्यादीचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहिले आहेत. प्रत्येक घटकांच्या सुख दुःखात ते सहभागी होतात मतदारसंघातील गावांची व तेथील प्रश्नांची जाण असणारा नेता अशी ओळख आ. सुरेश धस यांची आहे.महाराष्ट्रात महायुतीला विधान सभा निवडणुकीत मोठे यश मिळाले आहे या यशात मराठा समाजाचे मोठे योगदान आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. भाजपा वाढविण्यासाठी आ. सुरेश धस यांनी आहोरात्र मेहनत घेतली आहे. बीड जिल्ह्यातील विविध प्रश्न मार्गी लागावेत व सर्व घटकांना न्याय मिळण्यासाठी आ. सुरेश धस यांना मंत्री करून बीड जिल्ह्याचे पालकमंत्री करावे अशी मागणी मराठा समाजाच्या वतीने तसेच जि प सदस्य तथा उद्योजक ड प्रकाश दादा कवठेकर यांनी केली आहे.



# श्री. साई सेवा मंडळाच्या मानाच्या पालखीचे श्री.महेंद्रशेठ घरत व सौ. शुभांगीताई घरत यांच्या हस्ते पूजन!!



**उरण । विठ्ठल ममताबादे**

दरवर्षी प्रमाणे उरण तालुक्यातील श्री साई सेवा मंडळाची मानाची पालखी दिंडी सोहळा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी या पदयात्रेची सुरुवात करण्यात आली. या पदयात्रेसाठी दरवर्षी आर्थिक मदत करणारे दानशूर व्यक्तिमत्व श्री. महेंद्रशेठ घरत व त्यांच्या सौभाग्यवती शुभांगीताई घरत यांना या मानाच्या पालखी पूजनाचा मान देण्यात आला. महेंद्रशेठ घरत यांनी सपत्नीक यथासांग पालखीचे पूजन केल्यावर ही पालखी दिंडीने उरणहून शिर्डीकडे प्रस्थान केले. यावेळी उरण तालुक्यातील शेकडो पदयात्री उपस्थित होते.

# आता आमचा मूड चांगला:फडणवीस यांचा अनुभव महत्त्वाचा-पंकजा मुंडे

**मुंबई (वृत्तसंस्था)**

भाजप विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्यामुळे तेच महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री होतील हे आता स्पष्ट झाले आहे. त्यांच्या निवडीमुळे भाजपच्या पक्ष संघटनेत उत्साह संचारला आहे. भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी फडणवीसांच्या निवडीवर आनंद व्यक्त करत, आता आपला मूड चांगला असल्याचे स्पष्ट केले आहे. तर प्रसाद लाड यांनी २०१९ मध्ये गद्दारी करणाऱ्यांना गाडून जनतेने आम्हाला १०० टक्के जनादेश दिल्याचा दावा केला आहे.

भाजप विधिमंडळ पक्षाची बुधवारी सकाळी विधानभवनात बैठक झाली. त्यात देवेंद्र फडणवीस यांची एकमुखाने पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना पंकजा मुंडे यांनी फडणवीस यांच्या निवडीवर आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस यांची भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाली. मी त्यांना मनापासून शुभेच्छा देते. त्यांचा मुख्यमंत्रीपदाचा अनुभव महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा ठरेल. आता आमचा मूड चांगला आहे.

भाजप आमदार प्रसाद लाड यांनीही फडणवीस यांचे कौतुक केले. ते म्हणाले, जनतेने २०१९ मध्ये अखंड महाराष्ट्राच्या विकासासाठी शेतकरी, कष्टकरी, महिला कामगार, तरुण आणि राज्याच्या विकासासाठी आम्हाला जनादेश दिला होता. पण त्यात गद्दारी झाली. आता त्या गद्दारांना गाडून जनतेने आम्हाला १००% जनादेश दिला. आता देवेंद्र फडणवीस यांची भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाली. ते मुख्यमंत्री म्हणून उद्या शपथ घेतील याचा आम्हाला आनंद आहे.

भाजप नेते आशिष शेलार या प्रकरणी म्हणाले की, जनतेने यावेळी महायुतीला कौल दिला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेलाही चांगल्या जागा मिळाल्या. अजित पवारांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेसलाही चांगले यश मिळाले. पण भाजपला मिळालेले यश ऐतिहासिक आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात नरेंद्र मोदी व अमित शहा यांचे मार्गदर्शन आम्हाला मिळाले. भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी आम्ही सर्वानुमताने देवेंद्र फडणवीस यांचे नाव पुढे केले. आता सत्ता स्थापन करण्याचा दावाही सादर केलाज जाईल. आज आमच्यासाठी दिवाळीचा दिवस आहे.

माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार भागवत कराड यांनीही देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. ते म्हणाले, उद्या देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्राला विकसित राज्य बनवण्यासाठी फडणीसांसारख्या एका अनुभवी नेत्याची गरज होती. आम्ही त्यांच्या ५ वर्षांच्या सरकारचा अनुभव घेतला आहे. मी मंत्रीपदाच्या शर्यतीत नाही. आम्ही केवळ मिळालेले बहुमत व सन्मान यातच खूश आहोत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077